सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५ १/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक: डीआरए-०५२१/प्र.क्र.७१/२०२१/जाहिरात दिनांक: ३० डिसेंबर, २०२१

-: प्रसिध्दीपत्रक :-

विषय :- अधिष्ठाता, महानगरपालिका वैद्यक संस्था, बृहन्मुंबई महानगरपालिका, गट-अ - अर्ज करण्याकरीता संधी देणेबाबत

अधिष्ठाता, महानगरपालिका वैद्यक संस्था, बृहन्मुंबई महानगरपालिका, गट-अ (जाहिरात क्रमांक-०५/२०२१) करीता दिनांक २४ जून, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन वयोमर्यादेची कमाल गणना तत्कालिन शासन नियमानुसार करण्यात आली होती. तथापि, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.६१/कार्या-१२, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ अन्वये दिनांक ०१ मार्च, २०२० ते दिनांक १७ डिसेंबर, २०२१ (शासन निर्णयाचा दिनांक) या कालावधीत विहित कमाल मयोमर्यादा ओलांडली असेल त्या उमेदवारांसाठी अर्ज सादर करण्याची संधी देण्याचा शासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे.

**२.** शासनाकडून प्रस्तुत दिनांक १७ डिसेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विषयांकित संवर्गाकरीता दिनांक ०१ मार्च, २०२० ते दिनांक २६ जुलै, २०२१ या कालावधीत (जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक) कमाल वयोमर्यादा ओलांडली असेल अशा उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानुसार फक्त दिनांक ०१ मार्च, २०२० ते दिनांक २६ जुलै, २०२१ या कालावधीत वयाधिक ठरणा-या उमेदवारांनी खालीलप्रमाणे अर्ज सादर करण्याची प्रक्रिया करणे आवश्यक आहे :-

(१) अर्ज सादर करण्याचा कालावधी:- दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजी १८.०० वाजल्यापासून दिनांक ०३ जानेवारी, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यन्त

(२) ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्यासाठी विहित अंतिम दिनांक ०३ जोनवारी, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यन्त.

(३) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक ०४ जानेवारी, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यन्त.

(४) चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरावयाचा अंतिम दिनांक ०५ जानेवारी, २०२२ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत.

**३.** वरीलप्रमाणे विहित पध्दतीने व विहित कालावधीत अर्ज सादर करणा-या उमेदवारांनाच विषयांकित संवर्गाच्या निवडप्रक्रियेमध्ये भाग घेण्यास पात्र समजण्यात येईल.

सह सचिव (जाहिरात)

ठिकाण : मुंबई महाराष्ट्र लोकसेवा आयोग